# बृहन्मुंबई महानगरपालिका

कामगार विभाग

जाहिरात क्र.प्रकाअ/८०२/एमसी दिनांक २२.०१.२०२६

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील महाव्यवस्थापक, देवनार पशुवधगृहाच्या आस्थापनेवरील 'गट-ड' संवर्गामधील कामगार पदाची ३८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत महानगरपालिका आयुक्त यांची मंजूरी क्र.एमजीसी/एफ/७८७३ दि.०१.१०.२०२५ अन्वये प्राप्त झाली आहे. त्यानुसार महाव्यवस्थापक (देवनार पशुवधगृह) यांच्या आस्थापनेवरील ३८ रिक्त पदे सरळसेवेने भरतीप्रक्रिया राबवून निवड करण्यासाठी पात्र उमेदवारांकडून Online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/for prospects/Careers-All/Recruitment/ Chief Labour Officer या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आलेल्या जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत असून, त्यासाठी उमेदवारांनी वरील नमूद संकेतस्थळावर **'कामगार पदाकरिता ऑनलाईन अर्ज'** या लिंकवर ऑनलाइन पद्धतीने अर्ज विहित मुदतीत सादर करावेत.

**ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असलेला वैध(Valid) ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी (Mobile Number) असणे आवश्यक आहे.** भरती प्रक्रिया परीक्षेचे प्रवेशपत्र तसेच इतर माहिती वेळोवेळी ऑनलाईन पद्धतीने देण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी वैध राहणे आवश्यक आहे.

सरळसेवेने भरावयाच्या **'कामगार'** पदाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे:-

| **पदाचे नाव:-** | **वेतनश्रेणी (सुधारित):-** | **भरावयाच्या रिक्त पदांची संख्या :-** | **गट:-** |
|---|---|---|---|
| 'कामगार' | स्तर-M9.-रू.18,000-56,900 | ३८ | 'ड' |

(1) **सरळसेवा पध्दतीने भरावयाची पदे:- पदनाम-कामगार, एकूण रिक्त पदांची संख्या-३८**

**(अ)** सामाजिक आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे

| 'कामगार' एकूण रिक्त पदे-३८ | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशैमा प्रवर्ग | आदुघ | अराखीव (खुला) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयास उपलब्ध रिक्त पदे | **०९** | **०२** | **०२** | **०३** | **०३** | **०३** | **०१** | **१५** | **००** | **००** | **००** | **३८** |

**(ब)** उपरोक्त रिक्त पदांचे प्रवर्गनिहाय सामाजिक व समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे.

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशैमा प्रवर्ग | आदुघ | अराखीव (खुला) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | **०४** | **०१** | **०१** | **०२** | **०२** | **०२** | **०१** | **०४** | **००** | **००** | **००** | **१७** |
| महिला ३०% | **०३** | **०१** | **०१** | **०१** | **०१** | **०१** | **००** | **०५** | **००** | **००** | **००** | **१३** |
| माजी सैनिक १५% | **०१** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **०२** | **००** | **००** | **००** | **०३** |
| प्रकल्पग्रस्त ५% | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **०१** | **००** | **००** | **००** | **०१** |
| भूकंपग्रस्त २% | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** |
| खेळाडू ५% | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **०१** | **००** | **००** | **००** | **०१** |
| बृहन्मुंबई मनपा मध्ये प्रशिक्षण घेतलेल्या व NCTVT परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार १०% | **०१** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **०२** | **००** | **००** | **००** | **०३** |
| एकूण | **०९** | **०२** | **०२** | **०३** | **०३** | **०३** | **०१** | **१५** | **००** | **००** | **००** | **३८** |
| अनाथ १% | **०.३८ म्हणजे पूर्णांकात ०० पद** | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | **०१.५२ म्हणजे पूर्णांकात ०२ पदे (दिव्यांग प्रकार अ) अंध/अल्पदृष्टी -०१ पद, ब) कर्णबधिर/ऐकू येण्यातील दुर्बलता -०१ पद याप्रमाणे आरक्षित होईल.** | | | | | | | | | | | |

**(क)** 'कामगार' पदाकरिता दिव्यांग उमेदवारासाठी एकूण २ पदे आरक्षित असून सदर पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने, खालील नमूद दिव्यांग प्रकार, शारीरिक पात्रता व पदाची जबाबदारी आणि कर्तव्ये विचारात घेऊन अर्ज करणे आवश्यक आहे.

| पदनाम | भरावयाची पदे | **दिव्यांग प्रकार** | | | | | शारीरिक पात्रता | सदर पदाची जबाबदारी व कर्तव्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (a) अंध/ अंशत: अंध | (b) श्रवण शक्तीतील दोष | (c) चलनवलन विषयक विकलागंता | (d) मानसिक अपंगता | (e) एकाधिक अपंगाचा समावेश | | |
| कामगार | २ | B= Blind (अंध) LV= Low Vision (अल्पदृष्टी) | D=Deaf (कर्ण बधिरता) HH= Hard to Hearing (ऐकू येण्यातील दुर्बलता) | OA= One Arm (एक हात, अस्थिव्यंगता) BA = Both Arms (दोन्ही हात अस्थिव्यंगता) OL= One Leg (एक पाय अस्थिव्यंगता) OAL= One Arm and One Leg (एक हात आणि एक पाय अस्थिव्यंगता) CP= Cerebral Palsy (उन्माद पक्षाघात) LC= Leprosy Cured (कुष्ठरोग) Dw= Dwarfism (शारीरिक वाढ खुंटणे) AAV= Acid Attack Victims (आम्ल हल्लाग्रस्त) | ASD (M)= Autisum Spectrum Disorder (M=Mild (सौम्य- आत्मकेंद्रीपणा) ID=Intellectual Disability (बौद्धिक अपंगत्व) SLD=Specific Learning Disability (विशिष्ठ शिक्षण अक्षमता) MI=Mental Illness (मानसिक आजार) | MD involving (a) to (d) above =Multiple Disabilities involving (ए ते डी मधील एकाधिक अपंगाचा समावेश) | S=Sitting- (बसणे) ST=Standing (उभे रहाणे), W=Walking (चालणे), BN=Bending (वाकणे) RW=Reading & Writing (वाचणे आणि लिहिणे) SE=Seeing (पाहणे) H=Hearing (ऐकणे) C=Communication (संभाषण कौशल्य) MF=Manipulation by Fingers (बोटांची हालचाल करणे). | पशुवधगृहातील अंतर्गत रस्त्यांची साफसफाई करणे, पशुवधगृहाची स्वच्छता व धुलाई करणे, पशुवधगृहातील उघडया गटारांची व सांडपाणी वाहून नेणारे नाले यांची स्वच्छता करणे, प्रशासनाने वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे. |
| एकूण | 2 | 1 | 1 | | | | | |

परिपत्रक क्र.एमबीसी/3976 दि.10.04.2024 सोबतचा शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-2019/प्र.क्र.251/दि.क.2 दि.29.02.2024 मधील निर्देशानुसार Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्ये Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकाराचा समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासन सेवेतील जी पदे अस्थिव्यंग (Locomotor Disability) प्रवर्गातर्गत OA, OL, OAL, BLOA व BLA या दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत, अशी सर्व पदे Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction या स्वतंत्र उपप्रकारांसाठीसुद्धा सुनिश्चित राहतील. सदर संवर्गात प्रस्तुत भरती प्रक्रियेत या उप प्रकारांकरिता पद उपलब्ध होत नाही.

**ड) देवनार पशुवधगृहातील कामगार पदाची कर्तव्यसुची:-**

पशुवधगृहातील अंतर्गत रस्त्यांची साफसफाई करणे, पशुवधगृहाची स्वच्छता व धुलाई करणे, पशुवधगृहातील उघडया गटारांची व सांडपाणी वाहून नेणारे नाले यांची स्वच्छता करणे, प्रशासनाने वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे.

**टीप:-**

1.भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

2.रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक व समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर अंशत: किंवा पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

3.सामाजिक व अन्य समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

4.दिव्यांग उमेदवारांनी सदर पदाची कर्तव्ये, जबाबदारी, अपेक्षित शारिरीक क्षमता/पात्रता याबाबतची अपेक्षा दर्शविणारी माहिती संदर्भित करुन त्याप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे. 40% पेक्षा कमी दिव्यांगत्व असलेल्या उमेदवाराने दिव्यांग आरक्षणांतर्गत नियुक्तीसाठी अर्ज केल्यास अशा उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.

5.दिव्यांग उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक दिव्यांग२०२५/प्र.क्र.६७/आरक्षण-१ अन्वयेच्या दिनांक३१.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ६ मधील तरतूदीनुसार भरावयाची कार्यवाही करण्यात येईल.

6.दिव्यांग पदसुनिश्चितीनुसार विहीत पात्रता धारण करणारे दिव्यांग उमेदवार अराखीव गटातील रिक्त पदांअभावी, त्या-त्या जात प्रवर्गातून अर्ज करु शकतात व ते गुणवत्तेनुसार त्या-त्या प्रवर्गातून निवडीस पात्र ठरु शकतात व त्यावेळेस त्यांना त्या प्रवर्गाच्या उमेदवारांप्रमाणे सेवा शर्ती लागू राहतील.

7.बृहन्मुंबई महानगरपालिकेचे परिपत्रक क्र.एमबीसी/०१३५ दि.१७.०९.२०२५ सोबतचा महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि.क.2 दि.01.08.2025 अन्वये प्राप्त निर्देशानुसार व विशेष सूचनांनुसार, लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर सर्व तत्सम स्पर्धा परीक्षेप्रमाणे लेखनिक व इतर सोयी-सवलती लागू राहतील.

8.अराखीव(खुला), सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग तसेच अर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांकरिता पद उपलब्ध नसल्याने सामाजिक आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांच्या मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

9.एका उमेदवारास एकच अर्ज सादर करता येईल. कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास, त्यामधील अर्जाची फी भरल्याची विवरणे समान असल्यास फक्त शेवटची नोंदणी ग्राह्य धरण्यात येईल व इतर नोंद झालेल्या अर्जाची फी जप्त करण्यात येईल.

10.मागास प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या जात प्रवर्गातूनच अर्ज करणे आवश्यक राहिल परंतु, आरक्षण अधिनियमातील तरतूदीनुसार वि.जा./भ.ज. आरक्षण निवड/नियुक्ती करिता आंतरपरिवर्तनिय राहिल.

11. जाहिरातीत नमूद रिक्त पदे विचारात घेऊन उमेदवाराने त्याच्या जात प्रवर्गातून अर्ज करणे आवश्यक राहिल तसेच पदे उपलब्ध नसलेल्या प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांचे अर्ज बाद ठरविण्यात येतील.

**(2) <u>सामाजिक व समांतर आरक्षण.</u>**

2.1. **महिलांसाठी 30% प्रमाणे** आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000/ प्र.क्र.415/ का-2 दि.25.05.2001 अन्वयेच्या शासन निर्देशानुसार भरण्यात येतील. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर पदे त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

2.2. **माजी सैनिकांसाठी 15% प्रमाणे** आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.आरटीए-1079/0/482/16-अ, दि.16.04.1981 मधील निर्देशानुसार भरण्यात येतील. शासन निर्देशानुसार,माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास अशी पदे सदर भरती वर्षाकरिता रिक्त ठेवण्यात येतील. माजी सैनिकांकरिता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार असतील. माजी सैनिकांनी जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांना जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत, प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

2.3. **प्रकल्पग्रस्तांसाठी 5% प्रमाणे** आरक्षित पदे, बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र.10 दि.03.04.2008 अन्वये मंजूर मार्गदर्शक तत्वानुसार, नगरबाह्य विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलप्रकल्पासाठी संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठी पदे आरक्षित आहेत व ठाणे जिल्ह्यातील भातसा धरण प्रकल्पासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेचा ठराव क्र.231 दि.01.12.2020 अन्वये मंजूर झालेल्या 28 प्रकल्पग्रस्तांची गणना यामध्ये करण्यात येईल.बृहन्मुंबई महानगरपालिका साप्रवि क्र.एमपीएम/3/8368 दि. 06.02.2025 मधील मार्गदर्शक तत्वांतील कुटुंबाच्या व्याख्येतील नातेसंबंध ग्राह्य धरण्यात येईल.

2.4. **भूकंपग्रस्तांसाठी 2% प्रमाणे** आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. भूकंप-1009/प्र.क्र.207/2009/16-अ दि.27.08.2009 आणि शासन निर्णय क्र.भूकंप-1008/प्र.क्र.145/2008/16-अ दि.27.10.2008 मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार भरण्यात येतील. तसेच, शासन निर्णय क्र.विकाक 2215/ प्र.क्र.337/16-अ दि. 04.11.2016 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार भूकंपग्रस्तासाठी आरक्षित असलेल्या पदाकरीता पात्र

उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर पदे प्रकल्पग्रस्तांमधून भरण्यात येतील. तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

2.5. **खेळाडूंसाठी 5% प्रमाणे** आरक्षित पदे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/1260 दि.31.01.2017 सोबतचा महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रीधो-2002/प्रक्र.68/ क्रीयुसे-2 दि.01.07.2016 तसेच सम क्रमांकाचे शासन शुद्धीपत्रक दि.18.08.2016 आणि शासन निर्णय क्र.संकीर्ण-1716/प्र.क्र.18/क्रीयुसे-2 दि.30.06.2022 मधील दिलेल्या निर्देशानुसार शासन मान्य क्रीडा प्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरूष **खेळाडूंसाठी** 5% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रीधो-2002/प्रक्र.68/क्रीयुसे-2 दि.01.07.2016 अन्वये सुधारित तरतूदीनुसार विभागीय उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांच्याकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे उमेदवाराने कागदपत्रे पडताळणीच्यावेळीच विभागीय उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता, संबंधीत उपसंचालक,क्रिडा व युवक सेवा कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

खेळाडू आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या राज्य/ राष्ट्रीय स्पर्धेच्या प्रमाणपत्राबाबत शंका उद्भवल्यास आयुक्त/संचालक क्रीडा व युवक सेवा,पुणे यांच्याकडून विचारणा करण्यात येईल(शंका उद्भवल्याप्रकरणी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडील प्रमाणपत्र पडताळणी नंतर नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल).

2.6. **अनाथांकरिता 1% प्रमाणे** आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-2022/प्र.क.122/का-03 दि.06.04.2023 सम क्रमांकाचे शासन पूरक पत्र दि.10.05.2023 मधील निर्देशानुसार भरण्यात येतील. प्रस्तृत पदासाठी अर्ज करताना अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी सदर शासन निर्णय व शासन पूरक पत्रात विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार, संस्थात्मक प्रवर्गातील तसेच संस्थाबाह्य प्रवर्गातील अनांथांसाठी प्रमाणपत्र निर्गमित करावयाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करून, सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व **महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.** अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

अनाथ आरक्षणाच्या माध्यमातून अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाही तर ती पदे अनाथांच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. तसेच अनाथ व्यक्तींचे आरक्षण यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील. अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

2.7. **दिव्यांग आरक्षण 4% प्रमाणे** आरक्षित पदे, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 च्या आधारे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग 2018/प्र.क्र.114/16-अ दि.29.05.2019 व शासन निर्णय क्रमांक दिव्यांग२०२५/प्र.क्र.६७/आरक्षण-१ अन्वयेच्या दिनांक३१.०७.२०२५ अन्वयेच्या निदेशानुसार तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असलेली पदे भरावयाच्या एकूण पद संख्येपैकी असतील. दिव्यांग आरक्षणांतर्गत अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी किमान 40% कायमस्वरूपी दिव्यांगत्व असल्याबाबतचे शासकीय सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र.एमबीसी/604 दि.29.04.2021 सोबतचा महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग-2021/प्र.क्र.33/नवि-28 दि.16.04.2021 मधील निर्देशानुसार, सदर संवर्गाकरिता दिव्यांगांची पदे सुनिश्चित करण्यात आलेली आहेत. **सदरचा तपशील अनु क्र.1 (क) तक्त्यात नमूद करण्यात आला आहे.** लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.अप्रकि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि.14.09.2018 व शासन निर्णय दिव्यांग-2024/प्रक्र 86/दि.क.2 दि.27.06.2024 व दिव्यांग कल्याण विभागाचा शासन निर्णय क्रमांक दिव्यांग२०२५/प्र.क्र.१०/ईऑफीस क्र.१३३९०२०/कार्यासन-३ दिनांक०९.१०.२०२५ नुसार दिव्यांगत्वाचे

वैश्विक ओळखपत्र (UDID) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०१९/प्र.क्र.२५१/दि.क.२ दिनांक २९.०२.२०२४ मधील निर्देशानुसार Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्ये Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकार समाविष्ट करण्यात आला आहे.

2.8. **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग** (SEBC) **सरळसेवेने भरण्यात येणारी 10 % प्रमाणे आरक्षित पदे,** सन 2024 चा महाराष्ट्र शासन अधिनियम क्रमांक 16, दि.26.02.2024 अन्वये महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण अधिनियम 2024 मधील निर्देशांनुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाची(सा.शै.मा.व.) रिक्त पदे भरण्यात येतील. त्याचप्रमाणे शासन शुद्धिपत्रक क्र.बीसीसी-2024/प्र.क्र.75/आरक्षण-3 दि.15.03.2024 मधील निर्देशानुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी अर्ज करावयाच्या दिनांकापूर्वीचे सदर शुद्धिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या नमून्यातील सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग उमेदवारांकरिताचे आरक्षण राहील. प्रस्तृत भरती प्रक्रियेअंतर्गत 'कामगार' पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांची महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र.संकीर्ण-2024/प्र.क्र.79/आरक्षण-5 दि.19.04.2024 मधील निर्देशांनुसार प्रलंबित असलेल्या न्यायालयीन याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या आधीन राहून नियुक्ती करण्यात येईल.

2.9. **आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी (EWS) सरळसेवेने भरण्यात येणारी 10 % प्रमाणे आरक्षित पदे,** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.राआधो/4019/प्र.क्र.31/16-अ दि.12.02.2019 व सम क्रमांकाचा शासन निर्णय दि.31.05.2021 मधील निर्देशानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची (इ.डब्ल्यु.एस.) रिक्त पदे भरण्यात येतील. तसेच, सदर शासन निर्णय आणि शासन परिपत्रक क्र.राआधो2023/प्र.क्र.40/16-अ दि.23.03.2023 मधील निर्देशानुसार विहित करण्यात आलेली कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी संबंधित तहसिलदार यांनी वितरित केलेले व राज्य शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशाकरिता राज्य शासनाचा प्रमाणपत्राचा नमुना वापरणे आवश्यक आहे. केंद्रीय सेवांचा लाभ घेण्यासाठीचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र, राज्य शासकीय सेवांसाठीच्या पदभरती करिता वापरता येणार नाही.

2.10. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे परिपत्रक क्र.एमबीसी/9520 दि.11.04.2001 सोबतचा महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-1997/प्र.क्र.63/97/16-ब दि.18.10.1997 मधील निर्देशानुसार, विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती(क) व भटक्या जमाती(ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून, आरक्षित पदासाठी त्या-त्या प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवारांचा विचार, गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

2.11. **बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये (ॲप्रेन्टीसशीप) प्रशिक्षण घेतलेल्या सरळसेवेने भरण्यात येणारी 10% प्रमाणे आरक्षित पदे**

i. केवळ बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रशिक्षण घेऊन NCTVT (National Council of Training in Vocational Trades) परिक्षा उत्तीर्ण केलेल्या उमेदवाराने अर्जामध्ये स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

ii. कागदपत्रे पडताळणी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील खाते / विभाग / रुग्णालय यांनी दिलेले प्रशिक्षण प्रमाणपत्र आणि NCTVT परिक्षा उत्तीर्ण झालेले प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.

2.12 आरक्षण/अनुशेष यात बदल होण्याची शक्यता आहे.

**(3) 'कामगार' पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हताः**

शैक्षणिक अर्हता किमान इयत्ता १० वी परिक्षा १०० गुणांच्या मराठी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**(4) पात्रता, शारीरिक मोजमाप, वयोमर्यादा -**

I. अर्जदार भारतीय नागरिक असावा.

II. शारीरिक मोजमाप खालीलप्रमाणे आवश्यक राहील.

**अ) पुरुष उमेदवारः किमान वजन ५० कि.ग्रॅ. व उंची १५७ सें.मी.**

**ब) स्त्री उमेदवारः किमान वजन ४५ कि.ग्रॅ. व उंची १५० सें.मी.**

**III. वयोमर्यादा-जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास, उमेदवार खालील नमूद केलेल्या विहित वयोमर्यादेतील असावा.**

**अ) अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांसाठी – किमान 18 वर्षे ते कमाल 38 वर्षे**

**ब) मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी - किमान 18 वर्षे ते कमाल 43 वर्षे**

| अनु.क्र. | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
| --- | --- | --- |
| 3.1 | अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही 2015/प्र.क्र.404/कार्या.12 दि.25.04.2016 मधील तरतुदीनुसार किमान 18 वर्षापेक्षा कमी व कमाल 38 वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| 3.2 | मागासवर्गीय उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही 2015/प्र.क्र.404/कार्या.12 दि.25.04.2016 मधील तरतुदीनुसार किमान 18 वर्षापेक्षा कमी व कमाल 43 वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| 3.3 | माजी सैनिक उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मासैक-2010/प्र.क्र.279/10/16-अ दि.20.08.2010 मधील तरतुदीनुसार माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील, तसेच अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षेपर्यंत राहील. |
| 3.4 | प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रकल्प-1006/मु.स.396/प्र.क्र.56/06/16-अ, दि.03.02.2007 मधील तरतुदीनुसार कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील. सदर वयोमर्यादा सरसकट शिथिल केली असल्याने, मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांनाही कमाल वयोमर्यादेबाबत 45 वर्षापर्यंतची सवलत राहील. |
| 3.5 | खेळाडू उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रिधो-2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2 दि.01.07.2016 मधील तरतुदीनुसार, खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी विहित असलेल्या वयोमर्यादेत 05 वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल. तथापि, वयोमर्यादेत 05 वर्षांसाठी वयाची अट शिथिल करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा 43 वर्षे राहील. |
| 3.6 | दिव्यांग उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-1098/प्र.क्र.39/98/16-अ, दि.16.06.2001 मधील तरतूदीनुसार उच्चतम वयोमर्यादा सरसकट 45 वर्षे इतकी राहील. तथापि, दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांचे किमान दिव्यांगत्वाचे प्रमाण 40 % असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची निवड झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करू शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याची अंतिम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे. (सोबतच्या धारीणीतील पृ.क्र.203 ते 214) |
| 3.7 | अनाथ उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-2022/प्र.क्र.122/का-03, दि.06.04.2023 मधील तरतूदीनुसार अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना अनुसूचित जाती, या प्रवर्गातील उमेदवारांकरिता असलेली 43 वर्षे इतकी कमाल वयोमर्यादा लागू राहील. |
| 3.8 | स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.निवक-1010/प्र.क्र.08/2010/16-अ दि.06.10.2010 मधील दिलेल्या निर्देशानुसार कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील. सरसकट वयोमर्यादा शिथिल केली असल्याने, या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्षे इतकीच राहील. |
| 3.9 | महागनरपालिकेमधून प्रशिक्षण घेऊन NCTVT उत्तीर्ण उमेदवारांसाठी | केवळ बृहन्मुंबई महागनरपालिकेमधून प्रशिक्षण घेऊन NCTVT उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. |

| अनु क्र. | आरक्षण | किमान वयोमर्यादा वर्ष | कमाल वयोमर्यादा वर्ष |
|---|---|---|---|
| 1 | अराखील (खुला) प्रवर्गातील उमेदवारासाठी | 18 | 38 |
| 2 | मागास प्रवर्गातील उमेदवारासाठी | 18 | 43 |
| 3 | माजी सैनिक उमेदवारासाठी | सशस्त्र दलात केलेली सेवा+3 वर्षे कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे | |
| 4 | माजी सैनिक (दिव्यांग) उमेदवारासाठी | 45 | |
| 5 | प्रकल्पग्रस्त उमेदवारासाठी | 18 | 45 |
| 6 | भूकंपग्रस्त उमेदवारासाठी | 18 | 45 |
| 7 | खेळाडू उमेदवारासाठी | 18 | 43 |
| 8 | बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या व NCTVT परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारासाठी | 18 | 45 |
| 9 | अनाथ उमेदवारासाठी | 18 | 43 |
| 10 | दिव्यांग उमेदवारासाठी | 18 | 45 |
| 11 | स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य उमेदवार | 18 | 45 |

**तथापि, उन्नत व प्रगत गटांमध्ये (Creamy Layer) मोडणारे वि.जा-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, विमाप्र, इमाव प्रवर्गामधील उमेदवार, मागासवर्गीयांसाठी असलेले वय, परीक्षा शुल्क सवलत अथवा अन्य कोणत्याही सवलतीस पात्र नाहीत.**

**(5) <u>निवडीचे निकष</u>**

1) 'कामगार' या पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार, विहित केलेली अर्हता व अटी /शर्ती धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षा, संगणकावर घेण्यात येईल. सदर परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून विहित सामाजिक/समांतर आरक्षणानुसार तात्पुरती/अंतिम निवडयादी तयार करण्यात येईल.

2) 'कामगार' या पदासाठी बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा, विहित करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या समान राहील. सदर पदाकरिता घेण्यात येणाऱ्या बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेचे स्वरुप पुढीलप्रमाणे असेल:-

| अ.क्र. | परीक्षेचा विषय | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचे माध्यम | वेळ | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी भाषा व व्याकरण | 25 | 50 | मराठी | 100 मिनिटे | परिपत्रक क्र.एमपीआर/११६७ दि.२७.१२.२०२२ अन्वये प्रस्ताविण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रनिमं1222/ प्र.क्र.54/का.13-अ दि.04.05.2022 मधील तरतूदीनुसार गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. |
| 2 | इंग्रजी भाषा व व्याकरण | 25 | 50 | इंग्रजी | | |
| 3 | सामान्य ज्ञान | 25 | 50 | मराठी | | |
| 4 | बौध्दिक चाचणी | 25 | 50 | मराठी | | |
| | **एकूण** | **100** | **200** | | | |

★ सामान्य ज्ञान या विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधित तसेच स्थानिक बाबी/वैशिष्ट्ये आणि चालू घडामोडींशी निगडीत प्रश्न अंतर्भूत असतील.

★ बौध्दिक चाचणी परीक्षेचे स्वरुप पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेनुसार असेल.

★ मौखिक चाचणी घेण्यात येणार नाही.

★ इंग्रजी भाषा व व्याकरण या विषयाची ऑनलाईन परीक्षा इंग्रजी भाषेतून घेण्यात येईल तसेच मराठी भाषा व व्याकरण, सामान्य ज्ञान, बौद्धिक चाचणी या विषयांची ऑनलाईन परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल.

3) 'कामगार' पदाची अर्हता धारण करणाऱ्या पात्र उमेदवारांची, बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे, सामाईक गुणवत्ता यादीच्या आधारे तात्पुरती/अंतिम निवडयादी तयार करण्यात येईल.

सामाईक गुणवत्ता यादीतील दोन किंवा अधिक उमेदवारांचे गुण समान असल्यास, खालील निकष लागू राहतील:-

**अ. उमेदवाराच्या वयानुसार प्राध्यान्यक्रम देण्यात येईल(वयाने ज्येष्ठ उमेदवाराचा क्रम वरती असेल).**

**ब.** उपरोक्त **'अ'** नुसार समान असल्यास, अशा उमेदवाराचा गुणवत्ताक्रम त्यांच्या **आडनावाच्या अद्याक्षरानुसार** निश्चित करण्यात येईल.

उपरोक्त निवडीच्या निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार मान.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील. तसेच शैक्षणिक, व्यावसायिक व इतर कागदपत्रांच्या पडताळणीसापेक्ष तात्पुरती निवड यादी तयार करुन, पडताळणीअंती अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

4) 'एकाच दिवशी, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये किंवा अनेक दिवसात, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागली तर परीक्षेचा प्रथम दिवस ते अंतिम दिवस तसेच सत्र 01 ते अंतिम सत्र याबाबत **'सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method)' करण्यात येईल, 'सामान्यीकरण प्रक्रियेचे सूत्र (Normalisation Method Formula)'** जाहिरातीसोबत जोडण्यात येत आहे.

**(6) ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना.**

6.1 अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

6.2 ऑनलाईन पध्दतीने करावयाचा अर्ज https://portal.mcgm.gov.in/For prospects/Careers-All/ Recruitment/ Chief Labour Officer या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

6.3 उमेदवाराने वर नमूद केलेल्या संकेतस्थळास भेट देऊन जाहिरातीमध्ये नमूद मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करून अर्ज सादर करावा.

6.4 उमेदवारांच्या मार्गदर्शनार्थ पुढीलप्रमाणे कॉलसेंटर भ्रमणध्वनी क्रमांक:९५१३१६७४४३ सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० या वेळेत सोमवार ते शनिवार उपलब्ध असेल.

6.5 उमेदवाराने संपूर्ण अर्ज भरल्यानंतर **अर्जाची प्रिंट** काढून स्वत:जवळ ठेवावी. तसेच परिक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर ई-पावतीची प्रत काढून स्वत: जवळ ठेवावी.

**(7) ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक.**

| अनु. क्र. | तपशील | दिनांक /वेळ |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी लिंक सुरू होण्याचा दिनांक | दि.२८.०१.२०२६ |
| 2 | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी अंतिम दिनांक व वेळ | दि.१८.०२.२०२६ (वेळ रात्री 11:59:59 वाजेपर्यंत) |

**(8) ऑनलाईन परिक्षा शुल्क.**

ऑनलाईन परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे आकारले जाईल.

- अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांकरिता - रु.1000/- (वस्तु व सेवाकरासह)
- 'मागास प्रवर्गातील' उमेदवारांकरिता - रु.900/- (वस्तु व सेवाकरासह)

8.1 ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पद्धतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागेल.

8.2 परीक्षा शुल्क ना परतावा (Non-refundable) आहे. ऑनलाईन परिक्षेच्या वेळी सदर ईपावतीची प्रत प्रवेशपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे.

8.3 कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित/रद्द झाल्यास उमेदवारास पदभरती शुल्क परत करण्यात येणार नाही.

**(9) दिव्यांग उमेदवारांकरिता सूचना.**

**लेखनिक वापरणाऱ्या दिव्यांग व्यक्तींकरिता मार्गदर्शक सूचना :-**

महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण विभाग, शासन परिपत्रक क्र. दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि.क.2, दि. 01.08.2025 मधील निर्देशानुसार, लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनीक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यात येतील. दिव्यांग हक्क अधिनियम, 2016 मधील कलम 2(आर) अन्वये लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या ज्या दिव्यांग व्यक्तींना लिखाण करताना अडचणे / मर्यादा येतात, त्याचप्रमाणे ज्यांची लेखनाची गती कमी आहे अशा दिव्यांग व्यक्तींनी त्यांची इच्छा असल्यास, स्वत:च्या स्तरावर लेखनिकाची व्यवस्था करणे आवश्यक राहील. सदर दिव्यांग व्यक्तीस लिखाण करण्यास शारीरिक मर्यादा आहेत व त्याच्या वतीने परिक्षा देण्यासाठी लेखनीकाची आवश्यकता आहे, अशा आशयाचे शासकीय रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय अधिक्षक यांनी प्रमाणीत केलेल्या विहित नमून्यातील (Appendix-I) प्रमाणपत्र सादर केल्यानंतर लेखनिकाची सुविधा घेण्यास पात्र होईल. तसेच अंधत्व/शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधि असलेले/दोन्ही हात नसलेले)/मेंदूचा पक्षाघात या दिव्यांगांच्या प्रकारांमधील लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थींना त्यांची इच्छा असल्यास

लेखनीक/वाचक/प्रयोगशाळा सहाय्यक यांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी. या वर्गवारीमधील दिव्यांग परिक्षणार्थींना शासकीय रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय अधिक्षक यांनी प्रमाणित केलेले विहित नमून्यातील (Appendix-I) प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

दिव्यांगाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने निवड प्रक्रियेदरम्यान सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच, दिव्यांग प्रमाणपत्राबाबत महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.अप्रवि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि.14.09.2018 व शासन निर्णय क्र.दिव्यांग-2025/प्र.क्र.10/E-office No.1339020/कार्यासन-3 दि.09.10.2025 मधील निदेशानुसार, दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**(९) लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवारांकरीता विशेष सूचनाः-**

9.1 दिव्यांग उमेदवार प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वाचण्यास आणि / अथवा उत्तरे लिहीण्यास सक्षम नसल्याच्या कारणास्तव त्यास लेखनिकाची मदत अनुज्ञेय आहे. यास्तव, लेखनिकाने दिव्यांग उमेदवारास केवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराने उत्तर छायांकित करण्यास / लिहीण्यास मदत करणे अपेक्षित आहे.

9.2 लेखनिकाने प्रश्न वाचून दाखवल्यानंतर उमेदवाराने सांगितलेले उत्तरच विहीत ठिकाणी छायांकित करणे/लिहीणे अपेक्षित आहे. उत्तराच्या निवडीबाबत लेखनिकाने कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप / मार्गदर्शन / सूचना करू नये. तसेच परीक्षा यंत्रणेने प्रत्येकी ५ उमेदवारांकरीता (लेखनिकासह) एक समवेक्षक या प्रमाणात समवेक्षकाची नेमणूक करुन उमेदवाराने सांगितलेले उत्तरच लेखनिकाने विहीत ठिकाणी छायांकित / लिहिलेले आहे याची खातरजमा करावी. परीक्षा अधिक पारदर्शक होण्याच्या दृष्टीने परीक्षा यंत्रणेने शक्य असल्यास परीक्षा कक्षामध्ये सीसीटीव्ही / व्हिडीओ रेकॉर्डीग यंत्रणा बसवावी.

9.3 लेखनिकाने परीक्षा कालावधीत प्रश्नोत्तराबाबत अथवा इतर कोणत्याही विषयी उमेदवारांशी चर्चा / गप्पा करु नयेत. तसेच इतर लेखनिक / उमेदवार यांच्याशी बोलू नये.

9.4 दिव्यांग उमेदवार व लेखनिक यांना परीक्षांचे सर्व नियम / सूचना जशाच्या तसे लागू असतील.

9.5 उमेदवाराने स्वत: व्यवस्था केलेल्या लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसचे लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

9.6 वेगवेगळ्या विषयाच्या प्रश्नपत्रिकेसाठी मुख्यत्त्वेकरुन भाषाविषयक प्रश्नपत्रिकेसाठी वेगवेगळे लेखनिक नियुक्त करण्याची संबंधित दिव्यांगत्त्व असलेल्या परिक्षार्थी उमेदवारास परवानगी राहील. तथापि एका विषयाकरिता एकच लेखनिक वापरता येईल.

9.7 परीक्षेचे माध्यम (उदा. सर्वसाधारण / ब्रेल लिपी / संगणकाद्वारे / ध्वनीमुद्रण / ठळक व मोठ्या अक्षरातील प्रती) स्विकारण्याचा पर्याय संबंधित लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्त्व परिक्षार्थी उमेदवारास उपलब्ध करावा. जेणेकरुन परीक्षा यंत्रणेस सुलभरित्या तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रश्नपत्रिकेचे रुपांतर मोठ्या व ठळक अक्षरातील प्रतीमध्ये / ई-टेस्ट / ब्रेल लिपी / ब्रेल मजकूराचे रुपांतर इंग्रजी व प्रादेशिक भाषांमध्ये करणे सोईचे होईल.

9.8 ज्या परिक्षांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारले जातात, त्या परिक्षांसाठी जर दिव्यांग परिक्षार्थी स्वत: लेखनिक इ. ची व्यवस्था करणार असेल तर परिक्षा यंत्रणेने संबंधित लेखनिकाबाबतची माहिती ऑनलाईन पद्धतीने भरण्याची सुविधा परिक्षार्थीस उपलब्ध करून द्यावी.

9.9 दिव्यांगत्त्व असलेल्या व्यक्तींना, तसेच लेखनिक वापरण्यास परवानगी देण्यात आलेल्या दिव्यांगत्त्व असलेल्या व्यक्तींना देण्यात येणारा सदरचा भरपाई वेळ हा प्रति तास वीस मिनिटे यापेक्षा कमी नसेल. दिव्यांगत्त्व असलेले जे परिक्षार्थी लेखनिक वापरण्याची सुविधा मिळण्यास उपरोक्त विहित केल्यानुसार पात्र असतील, अशा परिक्षार्थींना त्यांनी लेखनिकाची सुविधा घेतलेली नसली तरीसुद्धा तीन तासांच्या परीक्षेसाठी किमान एक तास अधिक याप्रमाणे भरपाई वेळ (Compensatory Time) देण्यात येईल. जर परीक्षेचा वेळ एक तासापेक्षा कमी असल्यास भरपाई वेळ हा त्या प्रमाणात (pro-rata basis) देण्यात येईल. तथापि सदर वेळ हा पाच मिनिटांपेक्षा कमी नसेल व पाच मिनिटांच्या पटीत सदर वेळ देण्यात येईल.

9.10 परीक्षा यंत्रणेने लेखनिक यांची सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या प्रकरणी संबंधित लेखनिकाची शैक्षणिक पात्रता ही सदर परीक्षेकरीता निश्चित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असल्याबाबत खातरजमा करावी.

**शासकीय सक्षम प्राधिकाऱ्यांकडून किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व दिव्यांग प्रवर्गांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/36 दि.21.12.2009 मधील निर्देशांनुसार व दि. 09.10.2025 रोजीच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या निर्देशांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व वैद्यकीय मंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.**

**(10) परीक्षा केंद्रांविषयी नियमावली.**

10.1 परीक्षा केंद्राचा पत्ता परीक्षेच्या प्रवेशपत्रात नमूद केला जाईल.

10.2 संबंधित प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर **ऑनलाईन** पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.

10.3 परीक्षा केंद्र,स्थळ, दिनांक व सत्र इत्यादीबाबत बदल करण्याबाबतची विनंती मान्य केली जाणार नाही.

10.4 कोणत्याही प्रकारच्या प्रशासकीय व्यवहार्यतेकरीता कोणतेही परीक्षा केंद्र, परीक्षेचे स्थळ, दिनांक व सत्र यामध्ये बदल करण्याचा अधिकार परीक्षा आयोजक संस्था स्वत:कडे राखून ठेवत आहे.

10.5 उमेदवारांनी स्वत:च्या जबाबदारीवर परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित रहावयाचे आहे. या संबंधात उमेदवारास कोणत्याही स्वरुपातील इजा, दुखापत, हानी किंवा नुकसान झाल्यास, त्यास परीक्षा आयोजक संस्था जबाबदार राहणार नाही.

10.6 परीक्षेच्यावेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परीसरात भ्रमणध्वनी, गणकयंत्र(कॅल्क्युलेटर), आयपॅड, घडयाळ तत्सम इलेक्ट्रॉनिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधणे वापरण्यास सक्त मनाई असेल.

10.7 **प्रवेशपत्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ नमूद करण्यात येईल. परीक्षेचा कालावधी 100 मिनिटांचा असला तरी, उमेदवारांना विविध प्राथमिक औपचारीकता पुर्ण करण्यासाठी जसे की- सूचना देणे, ओळख पटवणे, आवश्यक विविध कागदपत्रांची पडताळणी, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे,इत्यादी, बाबींच्या पुर्ततेसाठी प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या वेळेच्या सुमारे 1 तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. परीक्षेच्या 15 मिनिटे आधी परिक्षा केंद्रावरील प्रवेश बंद करण्यात येणार असल्यामुळे, त्यानंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येणार नाही.**

## (11) ओळख पटवणे.

परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित होत असताना, उमेदवाराने मूळ प्रवेशपत्रासह [ अलिकडील फोटो चिकटवलेले त्याच्या मूळ प्रवेशपत्रावरील नाव व अर्ज नोंदणी प्रक्रियेदरम्यान दिलेले नाव ] अलिकडच्या काळातील फोटो ओळखपत्र, म्हणजेच पॅनकार्ड (PAN Card)/पासपोर्ट(Passport)/(कायमस्वरुपी) वाहनचालक परवाना(Permanent Driving License)/मतदार ओळखपत्र(Voter ID)/ बँकचे फोटोसह अधिकृत केलेले पासबुक/राजपत्रित अधिकाऱ्याने अधिकृत लेटर हेडवर जारी केलेला फोटोसह ओळखीचा पुरावा /स्थानिक नागरी प्रतिनिधीने अधिकृत लेटर हेडवर जारी केलेला फोटोसह ओळखीचा पुरावा/आधारकार्ड/छायाचित्रासह ई-आधारकार्ड /कार्यालयीन ओळखपत्र/छायाचित्रासह बार कौन्सिल ओळखपत्र, यापैकी कोणतेही दोन मूळ कागदपत्रे (छायाप्रतीसह) ओळखीचा पुरावा म्हणून सोबत बाळगणे आवश्यक आहे. तसेच सदर कागदपत्रे पर्यवेक्षकाने मागणी केल्यावर, पडताळणीसाठी पर्यवेक्षकास त्वरीत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मूळ प्रवेशपत्रावरील माहिती, उपस्थिती अहवाल व सादर करण्यात आलेल्या ओळखीच्या पुराव्यांची सत्यता पर्यवेक्षकांकडून तपासण्यात येईल. उमेदवाराच्या ओळख पटण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास त्याला / तिला परीक्षेस उपस्थित राहण्याची परवानगी नाकारण्यात येईल (शिधापत्रिका/शिकाऊ वाहन परवाना हे ओळखीचा पुरावा म्हणून वैध असणार नाही).

**टीप :-** परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित होत असताना, उमेदवाराने स्वत:ची ओळख पटविण्यासाठी आवश्यक ती मूळ कागदपत्रे (छायाप्रतीसह) मूळ प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी ही बाब लक्षात घ्यावी की, त्यांच्या मूळ प्रवेशपत्रावरील नाव (अर्ज नोंदणी प्रक्रिये दरम्यान दिलेले नाव) हे अलिकडच्या काळातील फोटो असलेले ओळखपत्राशी तंतोतंत जुळले पाहीजे. नाव/मधले नाव/आडनाव बदललेल्या विवाहित महिलांनी याची विशेष नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांनी त्यांचे नाव बदलले असेल, त्यांनी मूळ राजपत्र अधिसूचना/मूळ विवाह प्रमाणपत्र त्याच्या छायाप्रतीसह सादर केल्यावरच त्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येईल. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्रे नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

**1.परीक्षेसाठीचे वैध प्रवेशपत्र 2.मूळ फोटो ओळखपत्र 3.फोटो ओळखपत्राची छायांकीत प्रत 4.परिक्षाशुल्क ऑनलाईन भरल्याची ई-पावती**

## (12) सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method) :-

'एकाच दिवशी, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये किंवा अनेक दिवसात, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागली तर परीक्षेचा प्रथम दिवस ते अंतिम दिवस तसेच सत्र 01 ते अंतिम सत्र याबाबत **'सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method)' करण्यात येईल.'सामान्यीकरण प्रक्रियेचे सूत्र (Normalisation Method Formula)' जाहिरातीसोबत जोडण्यात येत आहे.**

## (13) Group wise time setter :-

बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेमध्ये प्रत्येक विषयामधील सोपे, मध्यम व कठीण प्रश्न, गटामध्ये अंतर्भूत करून त्यानुसार प्रत्येक गटासाठी वेळ निश्चित करून त्याप्रमाणे परीक्षेमध्ये "ग्रुप लेवल टायमरची" अंमलबजावणी करण्यात येईल. ग्रुप लेवल टायमरबाबत सूचना जाहिरातीसोबत जोडण्यात येत आहेत.

## (14) सर्वसाधारण अटी.

**14.1.** सदर भरती प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे व प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव सदर सरळसेवा भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.

**14.2.** विहित आरक्षणानुसार रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे नेमणूका करण्यात येतील. उमेदवार विहित अर्हता अटी/ शर्ती पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

**14.3.** अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला भरतीकरिता अर्ज करावयाचा असेल तर त्याने / तिने, त्याच्या / तिच्या खातेप्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र, अर्ज सादर करण्यापूर्वी घेणे आवश्यक आहे. सदर ना-हरकत प्रमाणपत्र/चौकशी प्रमाणपत्र प्रत्यक्ष नियुक्ती पूर्वी, नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.

**14.4.** उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.

**14.5.** इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.

**14.6. उमेदवाराने अर्जासोबत खालील नमुद केलेली शैक्षणिक, व्यवसायिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या साक्षांकित प्रती नियुक्तीपूर्वी तपासणीकरिता सादर करणे आवश्यक आहे:-**

**14.6-1.** उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, अर्हतेमध्ये नमुद केलेले विहित शैक्षणिक अर्हतेबाबतची गुणपत्रके व प्रमाणपत्र, मागासवर्ग उमेदवारांनी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, आणि अ.जा. व अ.ज. प्रवर्ग वगळता इतर मागास प्रवर्गासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र, अशाप्रकारे नमूद सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित प्रती, तसेच उमेदवाराची समांतर आरक्षणांतर्गत निवड झाली असल्यास, शासन निर्णयानुसार विहित प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर करणे आवश्यक असेल.

**14.6-2.** विवाहित महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबत,विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच राजपत्राची प्रत सादर करावी, ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

**14.6-3.** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.राआधो 4019/प्र.क्र.31/16-अ दि.31.05.2021 मधील निर्देशांनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेचे वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्राची वैधता, ऑनलाईन अर्ज नोंदणी केल्याच्या कालावधीपासून निवड प्रक्रिया चालू असतानाच्या कालावधीतील असावी.

**14.6-4.** बृहन्मुंबई महानगरपालिकेचे परिपत्रक क्र.एमबीसी/42 दि.01.06.2023 सोबतचा महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.महिआ 2023/प्र.क्र.123/कार्या-2 दि.04.05.2023 मधील निर्देशांनुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरिता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आलेली आहे. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled)असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतूदी लागू राहतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सत्यता पडताळणीबाबत, महाराष्ट्र शासन, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2021/प्र.क्र.297/मावक दि.26.04.2022 मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल. सदर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवाराच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी, संबंधित प्राधिकरणाकडून केल्यानंतर त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

**14.6-5.** महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल त्या पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेला अंतिम दिनांक इत्यादी तपशीलासह अर्ज, आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना सादर करुन त्यांचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**14.6-6.** फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड इत्यादी आवश्यक आहे.

**14.6-7.** महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-2022/प्र.क.122/का-03 दि.06.04.2023 सम क्रमांकाचे शासन पूरक पत्र दि.10.05.2023 मधील निर्देशानुसार अनाथांची पदे भरण्यात येतील. प्रस्तुत पदासाठी अर्ज करताना अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी सदर शासन निर्णय व शासन पूरक पत्रात विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार,संस्थात्मक प्रवर्गातील तसेच संस्थाबाह्य प्रवर्गातील अनाथांसाठी प्रमाणपत्र निर्गमित करावयाची कार्यपद्धतीचा अवलंब करून, सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही. अनाथ आरक्षणाच्या माध्यमातून अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत तरी ती पदे अनाथांच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

**14.7.** सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग अंतर्गत 'कामगार' पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांची महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र.संकीर्ण-2024/प्र.क्र.79/आरक्षण-5 दि.19.04.2024 मधील निर्देशांनुसार प्रलंबित असलेल्या न्यायालयीन याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून नियुक्ती करण्यात येईल.

**14.8.** उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशिल देणे आवश्यक आहे.

**14.9.** पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी संबधित पोलिस ठाण्याकडून उमेदवाराचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नियुक्ती केली जाईल.

**14.10.** उमेदवाराकडून प्राप्त झालेल्या चारित्र्य व पूर्वचारित्र्य प्रमाणपत्रातील दिनांकापासून ते सदर उमेदवारास सेवेत प्रत्यक्ष नियुक्ती देण्याच्या दिनांकाच्या कालावधीतील उमेदवाराची चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करण्यात येईल. सदर कालावधीत उमेदवाराविरूद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा आढळून आल्यास, सदर उमेदवाराचे नियुक्तीपत्र रद्दबादल करून, भारतीय दंडसंहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरूपी अपात्र ठरविण्यात येईल.

**14.11.** सदर परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांची, निवडीच्या निकषांनुसार, गुणवत्ता, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार निवडयादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/for prospects/careers-All/Recruitment/Chief Labour Officer या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर निवडयादी उमेदवाराच्या मूळ शैक्षणिक व इतर अनुषांगिक प्रमाणपत्रांच्या पडताळणीसापेक्ष असेल. उमेदवाराने आवश्यक प्रमाणपत्रे विहित कालावधीत पडताळणीकरिता सादर न केल्यास त्याचे नाव निवडयादीतून रद्द करण्यात येईल.

**14.12.** उमेदवाराची मूळ कागदपत्रे पडताळणी करुन ती नियमानुसार यथायोग्य असल्यास नेमणूक करण्यात येईल. तथापि, नेमणूकीच्या कार्यवाही दरम्यान उमेदवार निवडीच्या विहीत अर्हता पूर्ण करीत नाही असे निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर लक्षात आल्यास त्याची नेमणूक रद्द करण्यात येईल.

**14.13.** निवडयादी प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून 01 वर्षासाठी किंवा निवडयादी तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत त्यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. त्यानंतर ही निवडयादी व्यपगत होईल. तसेच शैक्षणिक, व्यावसायिक व इतर कागदपत्रांच्या पडताळणीसापेक्ष तात्पुरती निवड यादी तयार करुन, पडताळणीअंती अंतिम निवडयादी तयार करण्यात येईल.

**14.14.** प्रस्तुत भरती प्रक्रियेत रिक्त पदांची उपलब्धता व आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. सदरच्या नेमणुका उमेदवारांची गुणवत्ता, सामाजिक व समांतर आरक्षण, निवडयादीची विधीग्राह्यता, इ. बाबी विचारात घेऊन करण्यात येईल.

**14.15. 'कामगार'** पदाची भरती प्रक्रिया तसेच निवडयादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

**14.16.** काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास, त्याबाबतची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/for prospects/careers-All/Recruitment/Chief Labour Officer या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**14.17.** या भरती प्रक्रियेसंदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरील संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदर संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवेळी पहावे. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**14.18.** जर एखाद्या उमेदवाराने नियुक्तीवेळी **'कामगार'** पद स्वीकारण्यास कोणत्याही कारणाने नकार दिल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही कारणास्तव सदर पदावर काम करण्यास नकार दिल्यास, त्याची सदर पदावरील निवड रद्दबातल होईल.

**14.19.** निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम 2015 लागू होतील.

**14.20.** निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल. मात्र, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना [म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियम 1953 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना] त्यांना लागू होणार नाही.

**14.21.** प्रस्तृत भरती प्रक्रियेअंतर्गत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती, ही तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. त्यापुढील सेवासातत्य कर्मचाऱ्यांच्या परिविक्षाधिन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

**14.22.** निवड झालेल्या उमेदवाराची सदर पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या 01 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम, **'सुरक्षा अनामत रक्कम'** म्हणून उमेदवारास भरावी लागेल किंवा तशा आशयाचे क्षतीपूर्ती बंधपत्र सादर करावे लागेल. सदर 'सुरक्षा अनामत रक्कम' परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर, उमेदवारास बिनव्याजी परत मिळेल. उमेदवाराने'सुरक्षा अनामत रक्कम' भरल्यानंतर, महानगरपालिकेतील नेमणुक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास / राजीनामा दिल्यास तसेच काही कारणास्तव सेवा समाप्त / बडतर्फ केल्यास त्यांना सदर **'सुरक्षा अनामत रक्कम'** परत मिळण्याचा हक्क राहणार नाही.

**14.23.** निवड झालेल्या उमेदवारांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या **महाव्यवस्थापक (देवनार पशुवधगृह)** येथे नियुक्ती करण्यात येईल. तसेच निवड झालेल्या उमेदवारास आवश्यकतेनुसार,तिन्ही पाळींमध्ये(Shift Duty) कामकाज करावे लागेल.

**14.24.** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी/2011/प्र.क./1064/2011/16-ब दि.12.12.2011 मधील निर्देशानुसार सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवाराकडे नियुक्तीच्यावेळी जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, संबंधित उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून पडताळणी करुन घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी, नियुक्तीनंतर 01 महिन्याच्या आत सदर कर्मचाऱ्याने संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे दावा सादर करुन, त्याबाबतची पोचपावती नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक असेल. परंतु, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

**14.25.** उमेदवारांना परीक्षेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**14.26.** उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. सामाजिक व समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारास महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

**14.27.** महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, दि. 28.03.2005 रोजीची अधिसूचना व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 च्या अंमलबजावणीबाबत, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही 2000/ प्र.क्र.17/ 2000/12 दि.01.07.2005 मधील निर्देशांनुसार लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमून्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुध्दा सदरचे प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक असून, त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा)

**14.28.** निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महानगरपालिकेचे निवासस्थान उपलब्ध करून दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**14.29.** प्रस्तृत भरती प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.

**14.30.** अराखीव(खुला) पदांकरिता सर्व उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांचा(मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार केला जात असल्याने, सर्व उमेदवारांनी त्यांच्या अर्जामध्ये त्यांच्या मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे.

**14.31.** शासन निर्णय क्र. बीसीसी 2018/प्र.क्र.308/16-ब दि.21.12.2019 नुसार अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अथवा वर्ग करण्याची कार्यवाही चालू असलेल्या कर्मचाऱ्यांचे तसेच, मुळ नियुक्ती अ.ज. प्रवर्गातून झालेल्या मागासवर्गीय

कर्मचाऱ्यांनी अद्याप अ. ज. प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास आणि अ.ज. प्रवर्गातून नियुक्तीनंतर विशेष मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र सादर केलेल्या कर्मचाऱ्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**14.32.** निवड झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय तपासणीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय परिक्षकांकडे पाठविण्यात येईल. तसेच, दिव्यांग आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय तपासणीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविण्यात येईल. वैद्यकीय मंडळाच्या अहवालानुसार, उमेदवाराच्या नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल. 40% व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या उमेदवारांचाच अपंग आरक्षणांतर्गत नियुक्तीकरिता विचार करण्यात येईल.

**14.33.** उन्नत व प्रगत गटांमध्ये (Creamy Layer) मोडणारे वि.जा-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, विमाप्र, इमाव प्रवर्गामधील उमेदवार, मागासवर्गीयांसाठी असलेले वय,परीक्षा शुल्क सवलत अथवा अन्य कोणत्याही सवलतीस पात्र नाहीत.

**विशेष सूचना :-**

1) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी, अन्य प्रकारे सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तिला किंवा इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्वीकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची नोंद घ्यावी.

2) एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

3) मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याची सूचना उमेदवारांना देण्यात येत आहे.

4) सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीत देण्यात आलेल्या निर्देशांनुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा.

5) **'कामगार'** या संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या रिक्त पदांकरिता घेण्यात येणारी बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परिक्षा, महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रातील मुंबई शहरासह सहा प्रशासकीय विभागातील [उदा: कोकण,छत्रपती संभाजी नगर, पुणे,नाशिक,नागपूर आणि अमरावती] मध्यवर्ती शहरांमध्ये घेण्यात येईल.

6) परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या उद्भवल्यास त्याचा परिणाम ऑनलाईन परीक्षेवर किंवा निकालावर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये परीक्षेस होणारा विलंब, उमेदवारांवर होणारा परिणाम, तसेच उमेदवारांना पुन्हा परीक्षा देण्यास लागू नये यासह सर्व बाबींचे निराकरण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न परीक्षा आयोजित करणाऱ्या संस्थेद्वारा करण्यात येईल. तथापि, अशा परिस्थितीमध्ये जे उमेदवार सहकार्य करण्यास इच्छुक नसतील अशा उमेदवारांना भरती प्रक्रियेमधून पुर्णत: वगळण्यात येईल.

7) भरतीप्रक्रियेशी संबंधित सर्व बाबीबाबत महानगरपालिकेचा निर्णय हा अंतिम राहील. तसेच तो सर्व उमेदवारांना बंधनकारक राहील. याबाबत केल्या जाणाऱ्या विचारणा व पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

8) ऑनलाईन परीक्षेदरम्यान परीक्षा केंद्रांची क्षमता कमी असल्यास किंवा काही तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास एकापेक्षा जास्त सत्रामध्ये परीक्षा घेतल्या जातील.

9) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती दिली किंवा भरतीप्रक्रियेचे उल्लंघन केल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याला/तिला निवड प्रक्रियेदरम्यान अपात्र ठरविण्यात येऊन भविष्यात संस्थेच्या (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या) कोणत्याही भरतीप्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच सदर बाब भरतीप्रक्रियेनंतर निदर्शनास आल्यास पुर्वलक्षी प्रभावाने उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

10) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुद्ध व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये.

उमेदवारांनी उपरोक्त जाहिरातीचे संपुर्ण अवलोकन करुन, विहीत मुदतीत अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

सही/-२२.०१.२०२६
(सुनिल तु. जांगळे)
प्रमुख कामगार अधिकारी

## Introduction of mandatory time-bound sections in MCQ based examinations-reg.

विषय: MCQ आधारित परीक्षांमध्ये अनिवार्य कालमर्यादित विभागांचा समावेश करणे.

1. **BMC LABOUR DEPARTMENT** has decided to introduce mandatory time-bound sections in all its MCQ-based examinations which are conducted on a computer-based platform. This measure has been implemented to enhance the security and sanctity of the exams in light of emerging threats during the examination process.

1. BMC LABOUR DEPARTMENT ने संगणक-आधारित प्लॅटफॉर्म वर आयोजित केलेल्या सर्व MCQ आधारित परीक्षांमध्ये अनिवार्य कालमर्यादित विभाग लागू करण्याचा निर्णय घेतलाआहे. परीक्षा प्रक्रियेदरम्यान उद्भवणा-या धोक्यांच्या पार्श्वभूमीवर परीक्षेची सुरक्षा आणि महत्त्व वाढवण्यासाठी हा उपाय लागू करण्यात आला आहे.

2. The question paper in these examinations will be divided into multiple time-bound groups. **For example**, in **BMC LABOUR DEPARTMENT** ExamForLabour Post, if there are four time-bound sections (A, B, C & D) in the question paper, each section will have 25 questions and 25 minutes of time allotted. Candidates will be restricted from proceeding to the next section until they complete the allotted time for the previous section. Additionally, candidates will not be allowed to review the questions or modify their responses for a group after the completion of its allotted time. The questions for the next section will start automatically after the completion of the allotted time for the previous section.

2.या परीक्षांमधील प्रश्नपत्रिका विविध कालमर्यादित गटांमध्ये विभागल्या जातील. उदाहरणार्थ, **BMC LABOUR DEPARTMENT** परीक्षेत, कामगार पदासाठी प्रश्नपत्रिकेत चार कालमर्यादित विभाग (A, B, C आणि D) असल्यास, प्रत्येक विभागात 25 प्रश्न असतील आणि 25 मिनिटांचा वेळ दिला जाईल. आधीच्या विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण केल्या शिवाय उमेदवारांना पुढील विभागात जाता येणार नाही. याव्यतिरिक्त, उमेदवारांना दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर त्या गटातील प्रश्नांचे पुनरावलोकन करण्याची किंवा त्यांच्या प्रतिसादात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही. आधीच्या विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर पुढील विभागातील प्रश्न आपोआप सुरू होतील.

3. Candidates are given the option to mark any question, whether attempted or not, for review. This means that candidates can go through these marked questions in a section again before the allotted time for that section ends. It is important to note that questions marked for review will be evaluated.

3. उमेदवारांनी प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला असो वा नसो असा कोणताही प्रश्न पुनरावलोकनासाठी चिन्हांकित करण्याचा पर्याय दिला जातो. याचा अर्थ असा की उमेदवारांनी चिन्हांकित केलेले प्रश्न हे त्या विभागासाठी दिलेली वेळ संपण्यापूर्वी उमेदवार पुन्हा पाहू शकतात. पुनरावलोकनासाठी चिन्हांकित केलेल्या प्रश्नांचे मूल्यांकन केले जाईल हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

| **Pattern of Examination and related instructions / परीक्षेचेस्वरूपवसंबंधितसूचना** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| **Sr. No.** | **Subject Name / विषयाचेनाव** | **Group Name** | | | |
| | | **Group A** | **Group B** | **Group C** | **Group D** |
| 1 | Marathi language & Grammar / मराठीभाषाआणिव्याकरण | 7 Questions | 6 Questions | 6 Questions | 6 Questions |
| 2 | English language & Grammar / इंग्रजीभाषाआणिव्याकरण | 6 Questions | 7 Questions | 6 Questions | 6 Questions |
| 3 | General knowledge / सामान्यज्ञान | 6 Questions | 6 Questions | 7 Questions | 6 Questions |
| 4 | Aptitude Test/ बौद्धिक क्षमता | 6 Questions | 6 Questions | 6Questions | 7Questions |
| **Number of Questions / प्रश्नांचीसंख्या– Total 100 Questions** | | **25 Questions** | **25 Questions** | **25 Questions** | **25 Questions** |
| **Group Wise Timing / विभागानुसारवेळ - Total 100 Minutes** | | **25 Minutes** | **25 Minutes** | **25 Minutes** | **25 Minutes** |

**About Normalization:**

Normalization means adjusting values measured on different scales to a notionally common scale.

**Need for Normalization in Exam:**

Exam pertaining for a particular post/course could be spread across multiple shifts which will have different question paper for each shift. The normalization is to be done by considering the difficulty level of each set, since the questions may be different in different sets and difficulty level of a particular set may be different from other sets. Hence the normalization of scores needs to be carried out for all the candidates who had written the exam, across shifts for the same post/course.

## Mean Standard Deviation Method

$$\widehat{M}_{ij} = \frac{\overline{M}_t^g - M_q^g}{\overline{M}_{ti} - M_{iq}} \left(M_{ij} - M_{iq}\right) + M_q^{gm}$$

$\widehat{M}_{ij}$ = Normalized marks of $j^{th}$ candidate in the $i^{th}$ shift.

$\overline{M}_t^g$= is the average marks of the top 0.1% of the candidates considering all shifts (No. of candidates will be rounded-up)

$M_q^g$= is the sum of mean and standard deviation marks of the candidates in the paper considering all shifts.

$\overline{M}_{ti}$= is the average marks of the top 0.1% of the candidates in the $i^{th}$ shift (No. of candidates will be rounded-up)

$M_{iq}$= is the sum of mean marks and standard deviation of the $i^{th}$ shift

$M_{ij}$= is the actual marks obtained by the $j^{th}$ candidate in $i^{th}$ shift.

$M_q^{gm}$ = is the sum of mean marks of candidates in the shift having maximum mean and standard deviation of marks of candidates in the examination considering all shifts.

**Note:**

1. Calculation of marks will be done up to 5 decimal places.
2. Normalization of scores ensures that the marks accurately reflect the candidates' performance relative to the difficulty of the exam in every Shift. The mathematical process of normalization leads to increase or decrease of marks beyond the maximum or minimum marks.

# APPENDIX - I

**Certificate for person with benchmark disability covered under the definitation of secton 2 ( r ) of RPwD Act, 2016 i.e. persons having 40% or above 40% disability and having difficulty in writing.**

This is to certify that, I have examined Mr/Ms/Mrs ..........................................................(Name of the Candidate with benchmark disability), a person with ................................................................ (Nature and percentage of disability as mentioned in the certificate of disability), S/o/D/o.............................................., a resident of ........................................................................................... ( Village / District / State ) and to state that he/she has physical limitation which hampers his/her writing capabilities owing to his/her disability.

**Signature**

**Chief Medical Officer/Civil Surgeon/Medical Superintendent**
**of**
**a Government health care institute**
**Name and Designation**
**Name of Government Hospital/Health Care Centre with Seal**

Place:-

Date:-

Note:- Certificate should be given by a specialist of the relevant stream/disability (eg. Visual impairment - Ophthalmologist, Locomotor disability – Orthopaedic specialist/PMR).

# APPENDIX - II

**Certificate for person with specified disability covered under the definitation of secton 2 ( s ) of RPwD Act, 2016 but not covered under the definitation of Section 2 ( r ) of the said act, i.e. persons having less than 40% disability and having difficulty in writing.**

This is to certify that, We have examined Mr/Ms/Mrs ..................................................(Name of the Candidate, S/o/D/o............................................., a resident of ...................................................................................... ( Village / PO / PS / District / State ), aged ............. years, a person with ........................ (nature of disability / condition), and to state that he/she has limitation which hampers his/her writing capabilities owing to his/her above condition. He / She requires support of scribe for writing the examination.

2. The above candidate uses aids and assistive device such as prosthetics & orthotics, hearing aid (name to be specified) which is / are essential for the candidate to appear at the examination with the assistance of scribe.

3. This certificate is issued only for the purpose of appearing in written examination conducted by recruitment agencies as well as academic institutions and is valid upto ..................... ( It s valid for maximum period of 6 months or less as may be certified by medical authority.)

**Signature of medical authority**

| (Signature & Name) | (Signature & Name) | (Signature & Name) | (Signature & Name) | (Signature & Name) |
|---|---|---|---|---|
| Orthopaedic / PMR Specialist | Clinical Psychologist / Rehabilitation Psychologist / Psychiatrist / Special Educator | Neurologist (if available) | Occupational Therapist (if available) | Any other expert based on the condition of the candidate as may be nominated by the Chairperson. (If any) |
| (Signature & Name) | | | | |
| Chief Medical Officer / Civil Surgeon / Chief District Medical Officer ................. Chairperson | | | | |

Name of Government Hospital/Health Care Centre with Seal

Place:-

Date:-

## APPENDIX - III

### Letter of Undertaking for Using Own Scribe

I........................................................................., a candidate with ........................................(Name of the disability) appearing for the ...........................................................................................(Name of the examination) bearing Roll No.................... at ................................................................................ (Name of the Sub-Centre) in the District................................., Maharashtra. My qualification is......................................

I do hereby state that.............................................................. (Name of the Scribe) will provide the service of Scribe / Reader / Lab Assistant for the undersigned for taking the aforesaid examination.

I do hereby undertake that his qualification is ......................................................... In case, if it is found that scribe's qualification is not as declared by the undersigned or is equal to or higher than my qualification or if found to be more than or equal to the minimum qualification criteria of the examination. I shall forfeit my right to the post or certificate / diploma / degree and claims relating thereto.

(Signature of the candidate with Disability)

( Counter signature by parent / guardian, if the candidate is minor)

Place:-

Date:-